लेखी परीक्षा

| | |
|---|---|
| Test Booklet No/ प्रश्नपुस्तिका क्रमांक: 5020612 | D |
| Roll Number :- 1 6 0 4 9 1 8 | |
| Answer Sheet No:- 4 8 2 0 6 1 2   शस्त्रक्रिया गृह सहायक | |
| Post Code : 38 | |
| Total Question : 100 | Total Marks : 200 |
| Time : 2 Hours | |

A.S. mollick

Name and Signature of the invigilator

Signature of the Candidate

SE

## IMPORTANT INSTRUCTIONS

## महत्वाच्या सूचना

| | |
|---|---|
| 1. The test is of 2 hours duration and Question Booklet contains 100 questions. Each question carries 02 marks. For each correct response, the candidate will get 02 marks. | १. परिक्षेसाठी 2 तासांची वेळ आहे. प्रश्न पुस्तिकेमध्ये १०० प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी दोन गुण आहे. प्रत्येक अचूक उत्तरास दोन गुण मिळेल. |
| 2. Use Blue /Black Ball point Pen only for writing particulars on this page or marking responses. | २.या पानावर तपशील लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त निळा किंवा काळा बॉलपाईंट पेन वापरा. |
| 3. Rough work is to be done on the space provided for this purpose in the Questions booklet only. | ३. कच्चे काम करावयाचे असल्यास त्यासाठी याच प्रश्न पुस्तिकेमध्ये उपलब्ध केलेल्या स्वतंत्र जागेचा उपयोग करावा. |
| 4. On completion of the test, the candidate must handover the Answer sheet to the Invigilator before leaving the Examination Hall. The candidates are allowed to take away this Questions Booklet with them after examination is over. | ४. परीक्षा पुर्ण झाल्यानंतर उमेदवाराने परिक्षाकेंद्र सोडण्यापुर्वी मुळ OMR पत्रिका समावेशकांकडे जमा करणे बंधनकारक आहे. मात्र OMR Sheet ( उमेदवाराची प्रत ) व प्रश्नपुस्तिका उमेदवारांना बरोबर घेऊन जाण्याची परवानगी आहे. |
| 5. The candidates should ensure that Answer Sheet is not folded: Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. Anywhere else except in the specified space in the Questions Booklet and Answer Sheet. | ५.उमेदवाराने OMR Sheet च्या घडया घालू नयेत. OMR Sheet वर उत्तराचे गडद केलेले फक्त एकच वर्तुळ सोडून इतर कोणत्याही प्रकाराच्या खाणा-खुणा करु नयेत. प्रश्नपुस्तिका व OMR Sheet वरील निर्देशित केलेल्या ठिकाणीच आपला रोल नंबर लिहावा. |
| 6. Each candidate must show his/her Admit Card/Hall Ticket to Invigilator whenever demanded. | ६. परीक्षा केंद्रावरील समावेशकांनी मागणी केल्यानंतर उमेदवारांनी प्रवेशप्रत्र दाखवावे.(Admit card /Hall Ticket) |
| 7. No candidates should leave his/her seat without special permission of the Invigilator / Supervisor. | 7.परिक्षा केंद्रावरील समावेक्षक अथवा पर्यवेक्षक यांच्या विशेष परवानगी शिवाय कोणत्याही उमेदवारास आपली जागा अथवा परिक्षा कक्ष सोडता येणार नाही. |
| 8. Use of Electronic / Manual Calculator or any type of Electronic gadgets is prohibited. | ८.इलेक्ट्रॉनिक /मॅन्युअल कॅल्क्युलेटर किंवा कोणत्याही प्रकाराच्या इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. |
| 9. The candidates are governed by all Rules and Regulations of the examination and Commissionerate of Health services with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will he dealt with the rules & regulations of this examination & CHS. | ९.उमेदवारांनी परिक्षेसंबंधी लागु असणा-या सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.आचारसंहितेचा भंग केल्यास परीक्षा नियमावली व आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल. |
| 10. No part of Booklet and Answer sheet shall be detached under any circumstances till the end of examination. | १०.परिक्षा पुर्ण होईपर्यत कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिका तसेच उत्तरपत्रिका यांची पाने वेगळी करु नयेत. |

1) घोडयाला वाघ म्हटले, वाघाला सिंह म्हटले, सिंहाला हरिण म्हटले, हरणाला बैल म्हटले तर टांग्याला काय जुंपले जाईल ?

A) वाघ
B) घोडा
C) सिंह
D) हरिण

2) सतीश त्याच्या घरापासून पूर्वेला १८ किमी सायकलवर गेला. तेथून उजवीकडे वळून ३ किमी व पुन्हा उजवीकडे वळून ६ किमी अंतर त्याने कापले. शेवटी डावीकडे वळून त्याने ६ किमी अंतर कापले तर तो मुळ स्थानापासून (घरापासून) किती अंतरावर आहे ?

A) ९
B) १८
C) २१
D) १५

3) राजू, सुनिल व अरुण यांच्या वयांची बेरीज ७७ वर्षे आहे. तीन वर्षापूर्वी त्यांच्या वयांची बेरीज किती होती?

A) ७४ वर्षे
B) ६८ वर्षे
C) ६९ वर्षे
D) ६७ वर्षे

4) एका वर्गातील ६ मुलांना सरासरी ५० गुण आहेत व उर्वरीत मुलांना सरासरी ७५ गुण आहेत. सर्वांच्या गुणांची सरासरी ६० असल्यास त्या वर्गात एकूण मुले किती आहेत?

A) ४
B) १२
C) १०
D) १५

5) पुढील अंक मालिकेतील विसंगत घटक निवडा.

३१, ३८, ४८, ६१, ७५, ९६, ११८

A) ४८
B) ७५
C) ९६
D) ११८

6) एका मॉलसमोर काही मोटारसायकली व काही तीन चाकी रिक्षा उभ्या आहेत. त्यांच्या चाकांची एकत्रित संख्या ६५ असून हॅन्डलची संख्या २५ आहे. तर मोटारसायकली व तीन चाकी रिक्षा अनुक्रमे किती आहेत ?

A) १०, १५
B) १५, १०
C) २०, ५
D) ५, २०

7) माहीती तंत्रज्ञानामध्ये आय.पी. म्हणजे

A) इंडीव्युजअल प्रोटोकॉल
B) इंटरनेट पॅरामिटर
C) इंटरनेट प्रोटोकॉल
D) आयडेंटीफिकेशन प्रोटोकॉल

8) द.सा.द.शे. १०% दराच्या सरळव्याजाने रु.५०,००० चे रु.६०,००० होतात. तर रक्कम किती वर्षासाठी ठेवली ?

A) २ वर्षे
B) ४ वर्षे
C) ३ वर्षे
D) १ वर्ष

9) खालील उदाहरणात * चिन्हाच्या जागी कोणती संख्या असेल ?

२*६ + ३*२ + १४९ = ७*७

A) ३

B) ४

C) ५

D) ६

10) ताशी सरासरी ४५ कि.मी .वेगाने जाणारी बस निर्धारित ठिकाणी निर्धारित वेळेत पोहोचते .जर ती बस ताशी सरासरी ५४ कि.मी.वेगाने गेल्यास ती निर्धारित वेळेपेक्षा २० मिनिटे लवकर पोहोचते; तर तिने कापावयाचे एकूण अंतर किती ?

A) ८५ कि.मी.

B) ९० कि.मी.

C) १०५ कि.मी.

D) १२० कि.मी.

11) एका संख्येतून ५ वजा करून ७ ने भागल्यास उत्तर २ येते. तर त्या संख्येतून ४ वजा करून ३ ने भागल्यास उत्तर किती येईल?

A) ५

B) ६

C) ७

D) ८

12) खालील गटातील विसंगत शब्द ओळखा.

आईस्क्रीम, बर्फ, पाणी, वाफ

A) आईस्क्रीम

B) बर्फ

C) वाफ

D) वरीलपैकी एकही नाही

13) एका सांकेतिक लिपित अक्षरांऐवजी अंक वापरतात.या पध्दतीने चणचण, मरमर आणि पटपट हे शब्द अनुक्रमे ३४३४, ७२७२ आणि ५१५१ असे लिहितात. तर त्याच लिपित चटरपटर हा शब्द कसा लिहाल?

A) ३१२७१२

B) ५१२७१२

C) ३२१७१२

D) ३१२५१२

14) 'रा, यो, श, ग्ध, दु, र्क, ग' या अक्षरांपासून एक अर्थपूर्ण शब्द बनविल्यास त्यातील मधल्या अक्षराच्या उजवीकडील दुसरे अक्षर कोणते येईल ?

A) श

B) यो

C) रा

D) दु

15) विशालपेक्षा अक्षय 125 दिवसांनी लहान आहे. जर अक्षयचा जन्म १३ ऑगस्ट, शनिवारी झाला असेल तर विशालचा जन्म होणत्या दिवशी झाला असेल?

A) १० एप्रिल, रविवारी

B) १६ डिसेंबर, शुक्रवारी

C) ९ एप्रिल, शनिवारी

D) १५ डिसेंबर, गुरुवारी

16) 0.15 + 3.14 + 31.4 = ?

A) 6.43
B) 346.9
C) 34.69
D) 64.3

17) एका दुध संकलन केंद्रावर १२०० लिटर दुधाची आवक होते .जर २५ व्यक्ती प्रत्येकी दहा लिटर दुध केंद्रावरुन घेऊन जातात .तर केंद्रावर किती दुध शिल्लक राहिल?

A) २५० लिटर
B) ११७५ लिटर
C) ९५० लिटर
D) १२२५ लिटर

18) *३*४ ही चार अंकी संख्या १२ ने पूर्ण भाग जाणारी आहे. तर * च्या दोन्ही स्थानांवर एकच अंक येत असेल तर तो अंक कोणता?

A) १
B) २
C) ५
D) ४

19) घडयाळ सकाळचे ८ वाजलेले दाखवत आहे. दुपारचे २ वाजलेले दाखवण्यासाठी तासकाटा किती अंशातून फिरेल ?

A) १८०°
B) १५०°
C) १४४°
D) ११०°

20) खालील अंकमालेत कोणता अंक सर्वाधिक वेळा आला आहे ?

अंकमाला - २ ३ ३ ४ २ ५ ३ २ ३ ५ ४ २ १ ४ २ ३ ३ २ ५ ४ २ १ ५ ३ ४ २ ५ ३ २ ४ २ ३

A) 4
B) 3
C) 2
D) 5

21) सकाळी ६.४० वाजता सुटलेली ताशी ४५ किमी वेगाने धावणारी बस ३७५ किमी अंतरावरील गावी किती वाजता पोहोचेल ?

A) दुपारी २.५५ वाजता
B) दुपारी ३ वाजता
C) दुपारी ३.०५ वाजता
D) दुपारी २.५० वाजता

22) अमीरने २००० रुपयांच्या जितक्या नोटा बँकेत भरल्या तितक्याच नोटा १००० व २०० रुपयांच्या भरल्या. जर त्याने एकूण रक्कम १६००० रु. बँकेत भरली असेल तर त्याने भरलेल्या नोटांची संख्या किती?

A) 5
B) 15
C) 18
D) 21

23) हातमाग मंडळाने गि-हाईकास कापड विक्रीवर शे.११.५ रिबेट जाहीर केला. जर गि-हाईकाने ६५००० रुपयाची कापड खरेदी केली असेल तर त्याला किती रिबेट मिळेल?

A) रु. ६५६४
B) रु. ७४७५
C) रु.८४८५
D) रु.६४६५

24) ४२० मीटर लांबीची एक दोरी ६ ठिकाणी समान अंतरावर कापली तर प्रत्येक तुकडयाची लांबी किती सेंटिमीटर असेल?

A) 7000
B) 70
C) 700
D) 6000

25) एका पिशवीत काही गोळया आहेत. त्या गोळया १२ मुलांना प्रत्येकी सारख्या वाटल्यास ८ गोळया उरतात. तर पिशवीत कमीत कमी किती गोळया असतील ?

A) 30
B) 28
C) 80
D) 84

26) खालीलपैकी कोणत्या तारखांना दिवस व रात्र समान असतात ?

A) २२ एप्रिल
B) २१ मार्च
C) १ जानेवारी
D) १४ जानेवारी

27) महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे ?

A) हरीश साळवे
B) श्रीहरी अणे
C) आशुतोष कुंभकोणी
D) अभय ओक

28) राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी .................. असतात.

A) उपराष्ट्रपती
B) राज्याचे सचिव
C) मुख्यमंत्री
D) राज्यपाल

29) इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशीन व बॅलेट वर 'वरीलपैकी कोणीही नाही' (NOTA) हे बटन प्रथम कोणत्या वर्षीच्या निवडणुकांमध्ये वापरण्यात आले?

A) 2015
B) 2013
C) 2011
D) 2009

30) आरक्षणावर ५०% ची मर्यादा पुढीलपैकी कोणत्या खटल्यातील निर्णयानुसार लावण्यात आली आहे?

A) इनामदार खटला
B) केशवानंद भारती खटला
C) इंद्रा सहानी खटला
D) शांती भूषण खटला

31) खालीलपैकीकोणता जिल्हा हा तळी व तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो ?

A) उस्मानाबाद
B) भंडारा
C) अहमदनगर
D) भंडारदरा

32) सेलम, कृष्णा, टेकूरपेटा, राजापुरी ही नावे महाराष्ट्रात घेण्यात येणा-या कोणत्या पिकाच्या जातीची आहेत ?

A) हळद
B) ऊस
C) भूईमूग
D) तीळ

33) कोविड-१९ या आजाराची सुरुवात खालीलपैकी कोणत्या शहरात झाली?

A) शांघाय
B) बिजिंग
C) वुहान
D) तैवान

34) कोविड-१९ आजाराच्या निदानासाठी खालीलपैकी कोणती टेस्ट केली जाते ?

A) एच.आर.टी.सी.
B) एक्स-रे
C) आर.टी.पी.सी.आर.
D) एलायझा टेस्ट

35) म्युकरमायकोसिस हा आजार खालीलपैकी कशामुळे होतो ?

A) विषाणू
B) परजीवी कृमी
C) बुरशी
D) जीवाणू

36) कोविड विषाणूचा "डेल्टा" हा उपप्रकार सर्वप्रथम कोणत्या देशात आढळून आला ?

A) इंग्लंड
B) ब्राझिल
C) भारत
D) दक्षिण आफ्रीका

37) कोविड आजाराच्या पुढे १९ हा अंक का लिहिला जातो ?

A) या विषाणूमध्ये १९ प्रकारची प्रथिने असतात.
B) या विषाणूची लागण सर्वप्रथम २०१९ मध्ये झाली.
C) या विषाणूचे १९ उपप्रकार आहेत.
D) यापैकी नाही.

38) केळी पिकाचे शास्त्रीय नाव ................आहे?

A) पायरस मालुस
B) कोकोस न्युसीफेरा
C) पायरस कम्युनिस
D) मुसा पॅरॅडिसियाका

39) डॉ.आंबेडकरांनी नेतृत्व केलेल्या चळवळींची त्यांच्या कालनुक्रमानुसार मांडणी करा.

अ) काळाराम मंदिर सत्याग्रह

ब) चवदार तळे सत्याग्रह

क) मनुस्मृती दहन

ड) धर्मांतर चळवळ

A) अ, ब, क, ड

B) ब, क, अ, ड

C) अ, क, ब, ड

D) ब, क, ड, अ

40) खालीलपैकी कोणत्या व्यक्तीचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो?

A) कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत

B) राम गणेश गडकरी उर्फ गोविंदाग्रज

C) वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज

D) त्र्यंबक बापुजी ठोंबरे उर्फ बालकवी

41) नागरिकत्व कायदा, १९५५ अन्वये भारतीय नागरिकत्व मिळण्याचे मार्ग कोणते ?

अ) जन्माने नागरिकत्व

ब) नोंदणीद्वारे नागरिकत्व

क) स्वीकृतीने नागरिकत्व

ड) क्षेत्र विलीनीकरणाने नागरिकत्व

A) फक्त अ, ब आणि क

B) फक्त अ आणि क

C) फक्त अ आणि ड

D) अ, ब, क आणि ड

42) बी.सी.जी. (BCG) ही प्रतिबंधक लस कोणत्या आजारासाठी आहे?

A) कुष्ठरोग

B) पोलिओ

C) क्षयरोग

D) कॉलरा

43) पुढीलपैकी कोणती अन्नसाखळी बरोबर आहे ?

A) गवत - हरिण - बेडुक - सिंह

B) गवत - साप - ससा - वाघ

C) गवत - गरुड - वाघ - हत्ती

D) गवत - ससा - साप - गरुड

44) छत्रपती शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ला जिंकून त्याला कोणते नाव दिले ?

A) प्रतापगड

B) प्रचंडगड

C) रायगड

D) सिंहगड

45) महाराष्ट्रातील खालीलपैकी सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प कोणता ?

A) खोपोली

B) कोयना

C) वैतरणा

D) वरीलपैकी नाही

46) ................. हा एक प्रकारचा सायबर हल्ला आहे ज्यामध्ये संवेदनशील माहिती जाणून घेण्यासाठी किंवा एखादया खोटया/ बनावट वेबसाईटला भेट देण्यासाठी खूप लोकांना ई-मेल्स पाठविले जातात.

A) डी ओ एस
B) फिशींग
C) रॅनसम्वेअर
D) स्पिअर फिशींग

47) २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा भारतात कितवा क्रमांक लागतो?

A) पहिला
B) दुसरा
C) तिसरा
D) चौथा

48) डी.बी.टी (DBT)हे पुढीलपैकी कशाचे संक्षिप्त रुप आहे ?

A) डिमांड बाय ट्रेड
B) डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर
C) डायरेक्ट बँक ट्रान्सफर
D) डिडक्ट बाय ट्रान्झाक्शन

49) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना डी.एस.सी. ही पदवी कोणत्या शोध प्रबंधाबद्दल मिळाली ?

A) द अनटचेबल्स
B) द प्रॉब्लेम ऑफ रुपी
C) अ थॉटस ऑन पाकिस्तान
D) प्रबुध्द भारत

50) भारतातील मध्यवर्ती स्थान दर्शविणारे 'झिरो माइल' हे स्थान कोणत्या शहरात आहे?

A) नागपूर
B) भंडारा
C) गोंदिया
D) चंद्रपूर

51) 'At the crack of dawn' means .............

A) very early in the morning
B) accept the punishment
C) both (A) and (B)
D) none of the above

52) Write the correct preposition in the blank space from the given options:

"Hari is inferior____ Ram in intelligence."

A) than
B) to
C) from
D) against

53) They finished the work yesterday. (make interrogative)

A) Do they finish the work yesterday?
B) Did they finish the work yesterday?
C) Had they finished the work yesterday?
D) Have they finished the work yesterday?

54) Choose correct option after removing 'too' from the following sentence.
It is never too late to improve oneself.

A) It is very late to improve oneself.
B) It is never so late that one cannot improve oneself.
C) It is late that one cannot improve oneself.
D) Is it late that one cannot oneself improve.

55) Antonym of Brave

A) Achieve

B) Gain

C) Give

D) Cowardly

56) His father _____ a long time ago.

A) died

B) saw

C) broght

D) Bought

57) Antonym of Regression?

A) Progress

B) Reversion

C) Backward

D) Static

58) Meaning of "See Eye to Eye" ?

A) To agree fully

B) Not agreeing fully

C) In a battle field

D) Angry

59) Choose the word spelt correctly.

A) Satestfy

B) Satesfy

C) Satisfy

D) Satasfy

60) Choose the correct option which indicates the correct meaning of the underlined word in the following sentence :

Sachin was looking **gloomy** as he was reading a sad poem.

A) unhappy

B) good

C) cheerful

D) delighted

61) Read conversation between the librarian and the student. Choose the correct option and complete it.

Student: Can you __________ me the Oxford dictionary ?

Librarian : Sorry ! It's __________ to someone

Student : No problem. I'll take it some other time.

A) See, wipe

B) Lend, brought

C) Sell, expensive

D) Lend, issued

62) Choose the **correct** active sentence of the following statement.

Many vehicles are being looted and burnt by the agitators and hooligans.

A) Many vehicles are looted and burnt by the agitators and hooligans.

B) The agitators and hooligans have been looting and burning many vehicles.

C) Many vehicles are burning and looting the agitators and hooligans.

D) The agitators and hooligans are looting and burning many vehicles.

63) Positive degree : Comparative degree

a) No other metal is as heavy as lead.

b) Lead is heavier than any other metal.

**Answer options :**

A) Only (a) is correct

B) Only (b) is correct

C) Both (a) and (b) are correct

D) None of the above

64) Which one of the given options is **correct** about the given sentence?

"Either she or they have to attend the meeting."

A) Right

B) Wrong

C) Use of 'they' in the sentence is wrong

D) Verb "have" should be "has"

65) Fill in the blank in the following sentence choosing the correct option :

Is there ....................water in the tank ?

A) some

B) any

C) many

D) few

66) Choose the correct substitute for the following sentence

He thought that he was safe there.

A) He thought him to be safe there.

B) He thought about himself safe there.

C) He thought himself to be safe there.

D) He thought himself was safe there.

67) Coffee is _____ hot to drink.

A) too

B) so

C) very

D) more

68) Why did you write such a letter?

Change into passive voice

A) Why such a letter was written by you?

B) Why was such a letter written by you?

C) Why did such a letter written by you?

D) By you why was such a letter written

69) Choose the word that is nearly the same meaning as the word given in capital.

RESOLUTE

A) Solution

B) Steady

C) Dangerous

D) Stout

70) Antonym of Achieve ?
A) Fail
B) Gain
C) Give
D) Get

71) Find the odd stentence out. Choose one alternative.
A) What hard luck !
B) What did he do in the evening.?
C) How did you spend your holiday?
D) How was your holiday ?

72) Read the following riddle and choose one correct option.
I'm tall when I'm young.
I'm short when I'm old.
What am I?
A) Tree
B) Candle
C) Egg
D) Stick

73) Match the following :

| 'A' | 'B |
|---|---|
| (a) useful | (i) … ion |
| (b) prohibit | (ii) … ness |
| (c) manage | (iii) … ance |
| (d) perform | (iv) … ment |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| B) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| C) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

D) None of the above

74) Find out the **correct** form of conjunction in the following sentence :
"I allow you to drive my car on condition that you shall not over speed".
The underlined words are example of :
A) Co-ordinate conjunction
B) Subordinating conjunction
C) Compound conjunction
D) Correlative conjunction

75) Use the correct pronoun for the underlined noun in the following sentence :
Lal Bahadur Shastri went to Tashkent and signed a Peace Treaty.
A) They
B) It
C) He
D) She

76) "जो विकारी शब्द विशिष्ट अर्थाचा द्योतक नसून, ज्यास पूर्वापार संबंधाने सर्व प्रकारच्या द्वितीय नामाचा अर्थ येऊ शकतो त्यास ...............म्हणतात".
A) विशेषनाम
B) सर्वनाम
C) नाम
D) भाववाचक नाम

77) 'उखळ पांढरे होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ पुढीलपैकी कोणता?

A) आनंद होणे

B) भांडण करणे

C) भरपूर कष्ट करणे

D) वैभव प्राप्त होण

78) पुढील वाक्यांचे मिश्र वाक्य कसे बनवता येईल? 'रोपांना काळजीपूर्वक खतपाणी दिले. ती चांगली जोमाने वाढली.'

A) रोपे चांगली वाढण्यासाठी त्यांना काळजीपूर्वक खतपाणी दिले.

B) रोपांना काळजीपूर्वक खतपाणी दिल्याने ती चांगली वाढली.

C) रोपांना काळजीपूर्वक खतपाणी दिले आणि ती चांगली वाढली.

D) रोपे चांगली जोमाने वाढली कारण त्यांना काळजीपूर्वक खतपाणी दिले.

79) 'अनिता सुंदर गाणी गाते.' या वाक्यातील प्रयोग कोणता?

A) कर्मणी

B) कर्तरी

C) भावे

D) कर्तृ-कर्म संकर

80) 'वाटाण्याच्या अक्षता लावणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

A) विनंती मान्य न करणे, नकार देणे

B) खोडी काढणे, कुरापती काढणे

C) सर्वनाश करणे

D) वाईट विचारांनी वागणे

81) पुढील विभक्ती प्रत्ययांमधून पंचमी विभक्तीचे प्रत्यय ओळखा.

A) चा, ची, चे

B) ऊन, हून

C) स, ला, ना, ते

D) त, ई, आ

82) पुढील शब्दांमधून गटात न बसणारा शब्द ओळखा.

A) कांता

B) बायको

C) बाईल

D) नवरा

83) "त्याच्या तालावर पाकोळया नाचतात आणि पाखरे त्यांची साथ करतात" - वाक्यप्रकार ओळखा.

A) संयुक्त

B) केवल

C) मिश्र

D) गौण

84) "डोळे निवणे" या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

A) बरे वाटणे

B) स्वच्छ दिसणे

C) समाधान होणे

D) इच्छा पूर्ण करणे

85) "मितव्ययी" या शब्दसमुहाचा अर्थ काय?

A) मोजकाच आहार घेणारा
B) मोजकीच बाजू घेणारा
C) मोजकाचा खर्च करणारा
D) मोजकेच बोलणारा

86) "शिक्षक मुलांना शिकवितात" या वाक्यातील प्रयोग ओळखा.

A) कर्मणी प्रयोग
B) कर्तरी प्रयोग
C) भावे प्रयोग
D) संकरित प्रयोग

87) जे शब्द आपल्या मनातील वृत्ती किंवा भावना व्यक्त करतात त्यांना .............असे म्हणतात.

A) क्रियाविशेषण
B) शब्दयोगी
C) उभयान्वयी
D) केवलप्रयोगी

88) क्षणैक या संधीची फोड कोणत्या प्रकारे होते?

A) क्षण + ऐक
B) क्षण + एक
C) क्षणै + क
D) क्षणै + एक

89) खालील वाक्याचा काळ ओळखा.

सगळेच मूर्ख कसे असतील?

A) रीतीकाळ
B) भविष्यकाळ
C) भूतकाळ
D) वर्तमानकाळ

90) अधोरेखित शब्दातील शब्दयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा.

'<u>दगडापरीस</u> वीट मऊ'

A) विरोधवाचक
B) तुलनावाचक
C) साहचर्यवाचक
D) संबंधवाचक

91) 'पक्षी आकाशात उडाला' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

A) भावे प्रयोग
B) कर्मणी प्रयोग
C) अकर्मक कर्तरी प्रयोग
D) सकर्मक कर्तरी प्रयोग

92) पुढील पदयपंक्तीतील अंलकार ओळखा.

लहानपण दे गा। देवा मुंगी साखरेचा रवा ॥ 1 ॥
ऐरावत रत्न थोर। त्यासी अंकुशाचा मार ॥ 2 ॥

A) उपमा
B) दृष्टांत
C) उत्प्रेक्षा
D) अतिशयोक्ती

93) 'अमृताहूनि गोड नाम तुझे देवा' हे कोणत्या अलंकाराचे उदाहरण आहे?

A) अपन्हुती
B) व्यतिरेक
C) श्लेष
D) चेतनगुणोक्ती

94) कर्णापासून कान यांसारख्या शब्दांना काय म्हणतात?

A) तत्सम शब्द
B) देशी शब्द
C) तद्भव शब्द
D) परभाषीय शब्द

95) 'गरज ही कल्पकतेची आई होय', या वाक्यातील आई या शब्दाचा लक्ष्यार्थ कोणता?

A) माता
B) उत्पत्तीचे कारण
C) जन्मदात्री
D) माउली

96) पुढीलपैकी अशुध्द शब्द कोणता?

A) नावीण्यपूर्ण
B) प्रतीक्षागृह
C) परीक्षा
D) आध्यात्मिक

97) आधी जन्मलेला या शब्दसमूहाबद्दल पुढील कोणता शब्द वापरतात?

A) अनुज
B) आजन्म
C) अग्रज
D) अजात

98) "धोक्याची कामे करायला कोणी पुढे येत नाही' या अर्थाची म्हण ........................

A) ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी.
B) दाम करी काम.
C) मांजराच्या गळयात घंटा कोणी बांधायची ?
D) गर्जेल तो पडेल काय ?

99) 'सुसंगत' या शब्दाच्या विरुध्दार्थी शब्द ओळखा.

A) असंगत
B) विसंवादी
C) पारंगत
D) विसंगत

100) अण्णाभाऊ साठे यांच्या राज्यपुरस्कारप्राप्त कादंबरीचे नाव काय ?

A) विशाखा
B) फकिरा
C) दर्पन
D) ग्रामगीते